MHAU060011772016

# नियमित दिवाणी दावा क्र. १६५/२०१६ मधील नि.क्र. ३६ खालील आदेश

वादी यांनी सदर अर्ज प्रतिवादी क्रं. ४ चे वारस रेकॅार्डवर आणण्यासाठी अर्ज देण्यास झालेला विलंब माफ करण्यासाठी तसेच सदर प्रतिवादी विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रदद करण्यासाठी दाखल केलेला आहे. वादीचे कथन की, सदर दाव्यातील प्रतिवादी क्रं. ४ निर्मला ओंमपुरी गोसावी या दिनांक १३.०६.२०२० रोजी मयत झाल्या असुन सदर प्रतिवादीच्या वकीलांनी नि.क्रं. ३१ नुसार दिनांक १८.११.२०२१ रोजी पुरशीस दाखल करुन माहिती दिलेली आहे. त्यानंतर वादीने सदर मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी अर्ज दिलेला आहे. परंतु सदर वारस अभिलेखावर घेण्यासाठी २ वर्ष २ महिने विलंब झालेला आहे. सदर प्रतिवादी क्रं. ४ मयत झाल्याबाबतची माहिती वादीस सदर प्रतिवादी क्रं. ४ च्या वकीलांनी माहिती दिल्यानंतर समजले. सदर मयत प्रतिवादींच्या वारसांची माहिती मिळण्यास उशिर झाल्यामुळे वादी त्याबाबत वेळेत अर्ज दाखल करु शकला नाही. त्यामुळे सदर मयत प्रतिवादी क्रं. ४ चे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करुन सदर मयत प्रतिवादीविरुध्द झालेला अबेटमेंन्ट चा आदेश रदद करण्याची विनंती केली.

२. सदर अर्जास प्रतिवादी क्रं. १ ते ४ यांनी मागील बाजुस म्हणणे दाखल करुन हरकत घेतली केली. वादीने अर्जात दिलेले कारण योग्य नाही. वादीने सदर प्रतिवादी मयत झाल्यापासुन विहीत मुदतीत तिचे वारस अभिलेखावर घेतलेले नाही. त्यामुळे सदर अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

३. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. युक्तीवाद ऐकला.

४. वादीने सदर दावा वाटप, जाहीर ठराव व निंरतर मनाईहुकूमासाठी दाखल केलेला आहे. वादीच्या अर्जातील कथनानुसार प्रतिवादी क्रं. ४ ही दिनांक १३.०६.२०२० रोजी मयत झालेली आहे. त्याबाबत वादीने नि.क्रं. ३९ सोबत सदर मयत प्रतिवादी क्रं. ४ चे मृत्यु प्रमाणपत्राची छायांकित प्रत दाखल केलेली आहे. सदर प्रतिवादी मयत झाल्यानंतर वादीने प्रस्तुत अर्ज दिनांक १०.११.२०२२ रोजी दाखल केलेला आहे. सदर प्रतिवादी क्रं. ४ मयत झाल्याची पुरशीस प्रतिवादी क्रं. ४ च्या विधिज्ञांनी दिनांक १८.११.२०२१ रोजी नि.क्रं. ३१ वर दाखल केलेली आहे. त्यामुळे वादीस त्याबाबत दिनांक १८.११.२०२१ रोजी पासुन माहिती होती असे दिसते. परंतु असे जरी असले तरी सदर कारणाचा व नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता सदर दावा हा वाटपाचा असल्यामुळे प्रतिवादी क्रं. ४ चे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक व गरजेचे आहे व त्यामुळे दाव्याच्या गुणदोषावर निर्णय होण्यास मदतच होणार आहे. करीता मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

वादी यांचा नि.क्र. ३६ चा अर्ज प्रतिवादीस रक्कम रु.३००/-(अक्षरी रुपये तीनशे मात्र) खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

Digitally signed by PRAMOD MANIK KOLSE
Date: 2022.12.09 11:10:24 +0530

**(पी.एम.कोळसे)**

दिनांक– ०८.१२.२०२२

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर (न्यायालय क्रं.१)
कन्नड

**<u>प्रमाणपत्र</u>**

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ.निकालपत्र/आदेश यामधील सर्व मजकुर मुळ निकालपत्र/आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नांव – यो. सु. माळी.

न्यायालयाचे नांव – श्री. प्रमोद मा. कोळसे.
दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर),
तथा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कन्नड.

श्रुतलेखन दिल्याचा दिनांक – ०८.१२.२०२२

न्यायिक अधिका–यांनी
निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक– ०८.१२.२०२२

निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक – ०९.१२.२०२२

..............................................................